!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# गणेशोत्सव व नवरात्री आदि हिंदू धर्मीयांच्या सणावर वेळ मर्यादांची बंधने लादू नका : शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची मागणी

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला मान देऊन शपथ पत्राच्या अटींवर रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी द्या

**संभाजीनगर ( ता.०६ ) :** महाराष्ट्रासह देशात मोठ्या हर्षोल्हासात साजरा केला जाणारा गणेशोत्सव हा सण सर्व धार्मीकतेचा प्रतीक आहे. सर्वोच्च न्यायालयाने ध्वनीमर्यादा व लाऊड स्पीकर यांना रात्री १० वाजेपर्यंत परवानगी दिली आहे परंतु धार्मीक व सांस्कृतिक कार्यक्रमांना हा वेळ पुरेसा नसतो त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण १० दिवस लाऊड स्पीकरची वेळ रात्री १२ वाजेपर्यंत वाजविण्याची परवानगी देण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली.

सन १८९३ साली गणेशोत्सव हा सण लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी या उत्सवाला सुरुवात केली आहे. गणेशोत्सव हा सण महाराष्ट्रामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो व उत्सव धार्मिकता, सांस्कृतिक असलेला गणेश चतुर्थी हा सणामध्ये सर्व धार्मीय लोक सहभाग घेत असतात. शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी ही या उत्सवासंदर्भात रस्त्यावरील टाकण्यात येणाऱ्या मंडपाची नाकारण्यात येणाऱ्या परवानग्या संदर्भात महाराष्ट्रात आवाज उठवला आहे. गणेश महासंघ मंडळ व पोलीस प्रशासन यांनी ही सण उत्सव काळात परवानगी देण्याची कबुली दिली आहे.

व तसेच महाराष्ट्र, दिल्ली, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, गोवा तेलंगना, आंधप्रदेश, तामिळनाडू या इतर राज्यात सुध्दा हिंदू धार्मीक लोक गणेश चतुर्थी व नवरात्री साजरी करत असतात. त्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमात लाऊड स्पीकर वाजविण्याची वेळ रात्री १२ वाजेपर्यंत देण्यात यावी जेणेकरुन गणेश चतुर्थी या सणामध्ये होणारे सांस्कृतिक व प्रबोधनांत्मक कार्यक्रम हा सर्वांना पाहता येईल अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केंद्र शासनाकडे केली.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ / मनोज वडगावकर**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com
8421415255/9420404329

ganeshwagh4400@gmail.com
8484066606/9604384400